HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY

सत्यमेव जयते

(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रातील**

**दिवाणी अपिलीय अधिकारिता**

**दिवाणी अर्ज क्रमांक २०४१/२०१८**

**मधील**

**याचिका क्र. ७५०४/२०१५**

श्री बलवंतराय हरिलाल पारेख, मयत

कायदेशीर वारस :

परेश बलवंतराय पारेख आणि इतर ..... अर्जदार.

या प्रकरणातील.

श्री बलवंतराय हरिलाल पारेख, मयत

कायदेशीर वारस :

परेश बलवंतराय पारेख आणि इतर याचिकाकर्ते.

विरुद्ध

महाराष्ट्र राज्य आणि इतर .....प्रतिवादी

सह

**रिट याचिका (एस. टी. ) क्र. ११२५३/२०१७**

बाबू रामू कुशारे. ....याचिकाकर्ता.

विरुद्ध

महाराष्ट्र राज्य आणि इतर. ....प्रतिवादी

सह

**रिट याचिका (एस. टी. ) क्र. ११२५४ /२०१७**

बाबू रामू कुशारे. .....याचिकाकर्ता.

विरुद्ध

महाराष्ट्र राज्य आणि इतर ..... प्रतिवादी

अर्जदारांसाठी बाळासाहेब गुंडा लिगाडे (CAW २०४१/१८ मध्ये) दोन्ही याचिकांमधील याचिकाकर्त्यांसाठी संदीप शिंदे आणि रवी असाबे यांच्या निर्देशानुसार एर्गो ज्युरीस

श्री. वाय. एस. खोचरे, सहाय्यक सरकारी वकील , प्रतिवादी/राज्याकरिता सर्व प्रकरणांसाठी

**न्यायवृंद : न्यायमूर्ती ए. एस. ओक आणि न्यायमूर्ती एम. एस. सोनक**

**राखून ठेवल्याचा दिनांक : २ नोव्हेंबर २०१८**

**अधिघोषीत केल्याचा दिनांक: ५ डिसेंबर २०१८**

**न्यायनिर्णय** : (न्यायमूर्ती ए. एस. ओक द्वारा )

या तीनही याचिकांमध्ये एक मुद्दा समान आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (संक्षिप्त "सदर संहिता") अंतर्गत पुनरीक्षण अर्ज आणि अपील राज्य सरकारद्वारे कोणत्या पद्धतीने हाताळले जातात याविषयीचा हा मुद्दा आहे. वकील परिषदेला सादर केलेल्या निवेदनांच्या आधारे, या तीन याचिकांमधील मुद्दे/तक्रारींचा सारांश खालीलप्रमाणे करता येईल:

(क) या संहितेच्या तरतुदींनुसार राज्य सरकारकडे विचारार्थ येणारे अपील/पुनरावलोकन अर्ज आणि विशेषतः अंतरिम दिलाशासाठी केलेले अर्ज दीर्घ काळापर्यंत प्रलंबित राहतात.

ख) अंतरिम दिलाशासाठीच्या अर्जांवर बराच काळ सुनावणी होत नसल्याने, अपीलकर्त्यांना/अर्जदारांना भारतीय राज्यघटनेच्या कलम २२६ अन्वये अपीलीय/पुनरावलोकन प्राधिकरणाला आवश्यक निर्देश जारी करण्यासाठी या न्यायालयात येणे भाग पडते.

(ग) पक्षकारांना किंवा त्यांच्या वकिलांना तातडीचा अंतरिम दिलासा मिळविण्यासाठी अपीलीय/पुनरावलोकन प्राधिकरणासमोर त्यांच्या प्रकरणांचा उल्लेख करण्याची संधीच मिळत नाही आणि जेव्हा अपील/पुनरीक्षण प्राधिकारी उपलब्ध होतील तेव्हाच त्यांच्या अर्जांची सुनावणी केली जाते.

(घ) न्यायनिर्णय अधिघोषीत करण्याची कोणतीही तारीख निश्चित केलेली नसते. नेहमीच, न्यायनिर्णय आणि/किंवा आदेश देण्यास विलंब होतो. न्यायनिर्णयाला आणि आदेशास प्रभावीपणे आव्हान देण्यासाठी अंतरिम दिलासा चालू ठेवण्यासाठी अपयशी पक्षाला अर्ज करण्याची कोणतीही संधी उपलब्ध नसते .

२. रिट याचिका (एस. टी.) क्र. ११२५३/२०१७ मध्ये याचिकाकर्त्याची अशी तक्रार आहे की, मार्च २०१६ मध्ये याचिकाकर्त्याने प्राधान्याने दाखल केलेल्या अपिलाची सुनावणी राज्य सरकार जे की अपिलीय प्राधिकरण आहे त्यांनी सुनावणी घेतली नाही तसेच अंतरिम दिलाशासाठीच्या अर्जावरही सुनावणी घेतली नाही. रिट याचिका (एस. टी.) क्र. ११२५४/२०१७ मधील तक्रारही समसमान आहे.

३. या न्यायालयाच्या खंडपीठाने दिनांक ६ ऑगस्ट २०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये रिट याचिका क्र.७५०४/२०१५ निकाली काढण्यात आली असून याचिकाकर्त्यांनी प्राधान्याने दाखल केलेल्या पुनरीक्षण अर्जावर वर्ष २०१५ च्या अखेरीस निर्णय घेण्याचे निर्देश राज्य सरकारला दिले आहेत. सदर आदेशाचे पालन न झाल्यामुळे, त्यामध्ये अवमान याचिका दाखल करण्यात आली होती

जी या न्यायालयाच्या अन्य खंड न्यायपीठाने ८ सप्टेंबर २०१६ च्या आदेशाद्वारे निकाली काढली होती ज्याद्वारे पुनरिक्षण अर्ज निकाली काढण्यासाठी दोन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली होती. दिवाणी अर्ज क्रमांक २०४१/२०१८ मधील तक्रार अशी आहे की या न्यायालयाने दोन आदेश पारित करूनही सदरचा पुनरीक्षण अर्ज निकाली काढला गेला नाही. इथे आपण हे लक्षात घेतले पाहिजे की सदरच्या दिवाणी अर्जामध्ये, महसूल आणि वन विभागाच्या कार्यासन अधिकाऱ्याने सहाय्यक सरकारी वकील यांना उद्देशुन केलेले दिनांक २४ सप्टेंबर २०१८ रोजीचे एक पत्र दाखल केले आहे ज्यामध्ये दिनांक २३ ऑगस्ट २०१७ च्या न्यायनिर्णय आणि आदेशानुसार पुनरीक्षण अर्ज निकाली काढण्यात आल्याची नोंद आहे. ८ सप्टेंबर २०१६ च्या आदेशान्वये निश्चित केलेल्या मुदतीत पुनरिक्षण अर्ज निकाली काढता आला नसल्याची खंत या पत्रात व्यक्त करण्यात आली आहे. सदर आदेश अर्जदाराला देण्यात आला नसल्याचेही यात स्पष्ट करण्यात आले आहे. अशा तक्रारी उद्भवण्याचे कारण हे आहे की, उक्त संहिते अंतर्गत अपील आणि पुनरीक्षण अर्जांची राज्य सरकारद्वारे सुनावणी घेतल्यानंतर, निकाल घोषित करण्याची तारीख पक्षकारांना कधीही कळवली जात नाही.

४. आम्ही पक्षकारांच्या वतीने उपस्थित असलेले त्यांचे विद्वान वकील तसेच राज्यासाठी उपस्थित असलेले सहाय्यक सरकारी वकील यांचे सविस्तर म्हणणे ऐकले आहे. रिट याचिका क्र. ४१०१/२००७ (श्रीमती सावित्री चंद्रकेश पाल विरुद्ध महाराष्ट्र राज्य आणि इतर) मधील २४ मार्च २००९ रोजीच्या न्याय निर्णयायाकडे आणि आदेशाकडे आमचे लक्ष वेधण्यात आले आहे, ज्यामध्ये राज्य सरकारद्वारे अपील हाताळण्याची प्रक्रिया विहित केलेली आहे. आमचे लक्ष १७ फेब्रुवारी २०११ च्या रिट याचिका क्र.९७०८/२०१० (श्रीमती छाया जगन काळे विरुद्ध महाराष्ट्र राज्य आणि इतर) मधील न्याय निर्णय आणि आदेशाकडे देखील वेधले गेले आहे ज्यामध्ये मार्गदर्शक तत्त्वे विहित केली गेली आहेत. विद्वान सहाय्यक सरकारी वकील यांनी महसूल आणि वन विभागाने जारी केलेल्या १७ डिसेंबर २०१५ च्या शासन निर्णयाची प्रत अभिलेखावर ठेवली आहे ज्यामध्ये राज्य

सरकारसमोर दाखल केलेल्या अपील आणि पुनरीक्षण अर्ज हाताळण्यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे विहित करण्यात आली आहेत. यात नोंदवहीची तजवीज करण्याची तरतूद आहे.यामध्ये अपिलामधील अंतरिम अर्जांच्या निपटा-यासाठी मुदत निश्चित करण्यात आली आहे.विद्वान सहाय्यक सरकारी वकिलांनी सदर समस्येवर तोडगा काढण्यासाठी राज्य सरकारद्वारे जारी केला जाणारा प्रस्तावित मसुदा अधिसूचना/शासकीय ठराव देखील अभिलेखावर ठेवला आहे. या मसुद्याच्या संदर्भात राज्य सरकार शासन निर्णय जारी करण्यास इच्छुक असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

५. याचिकाकर्त्यांतर्फे उपस्थित असलेल्या विद्वान वकिलांनी अशा प्रकारच्या अपील आणि पुनरीक्षण अर्जांना ज्या पद्धतीने हाताळले जात आहे त्यासंदर्भातील विविध मुद्द्यांकडे आमचे लक्ष वेधले आहे. हे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, प्रत्यक्षात, व्यावहारिकदृष्ट्या जिथे तातडीची गरज आहे अशा प्रत्येक प्रकरणात, राज्य सरकार या संहितेअंतर्गत अपील/पुनरीक्षण प्राधिकरण म्हणून अंतरिम अर्जांच्या सुनावणीला प्राधान्य देत नसल्यामुळे, अपीलकर्ते/अर्जदारांना रिट कोर्टात जाण्यास भाग पाडले जाते.

६. आम्ही या निवेदनांचा विचार केला आहे. सामान्यत: सदर संहितेच्या कलम २४७ अंतर्गत कार्यवाहीमध्ये पारित आदेशांविरुद्ध दोन अपीलांवर उपाय करण्याची तरतूद आहे. कलम २४८ हे राज्य सरकारकडे कोणते अपील करायचे या संबंधित आहे. कलम २४८ असे सांगते :

> "**२४८. राज्य शासनाकडे अपील केव्हा करावे :** आयुक्ताने किंवा जमाबंदी आयुक्तांनी किंवा भूमि अभिलेख संचालकाने किंवा भूमि अभिलेख संचालकाचे अधिकार निहित केलेल्या भूमि अभिलेख उपसंचालकाने दिलेल्या कोणत्याही निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध राज्य शासनाकडे अपील करता येईल ; मात्र अशा अधिकाऱ्याच्या हाताखालील कोणत्याही अधिकाऱ्याने अपिलात जो निर्णय किंवा आदेश नमूद केला असेल त्यावर अशा अधिकाऱ्याने जो कोणताही निर्णय किंवा आदेश दिला असेल त्याविरुद्ध अपील करता येणार नाही ."

या संहितेच्या कलम २५० मध्ये मुदतमर्यादा नमूद करण्यात आली आहे आणि कलम २५१ विलंब माफ करण्याचा अधिकार प्रदान करते. कलम २५४ अपीलांच्या अनुषंगाने आहे. पोट-कलम (२) च्या तरतूदीमध्ये राज्य सरकारला रक्कम भरण्याच्या आदेशाला कोणत्या अटींवर स्थगिती दिली पाहिजे ते नमूद केले आहे.

७. कलम २५७ आणि विशेषत: पोट-कलम (१) राज्य सरकारला काही आदेशांविरुद्ध पुनरीक्षण अर्ज स्वीकारण्याचा अधिकार प्रदान करते. कलम २५७ असे सांगते :

> **"२५७ राज्य शासन व विवक्षित महसूल आणि भू-मापन अधिकाऱ्यांना त्यांच्या दुय्यम अधिकाऱ्यांचे अभिलेख आणि कार्यवाही मागविण्याचा व त्यांची तपासणी करण्याचे अधिकार.**
>
> (१) राज्य शासन आणि कोणतेही महसूल किंवा भू-मापन अधिकारी, सहाय्यक किंवा उपजिल्हाधिकारी किंवा भूमी अभिलेख अधीक्षक यांच्या दर्जाहून कमी दर्जाचा नाही अशा कोणत्याही त्यांच्या संबंधित विभागातील, अधीनस्थ महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्यांचे, शासनास स्वतःची किंवा यथास्थिति अधिकाऱ्यास स्वतःची खात्री करण्याच्या हेतूने, जसे की परिस्थिती असेल, कोणत्याही निर्णयाची किंवा आदेशाची कायदेशीरपणाबद्दल किंवा औचित्याबद्दल आणि अशा अधिकाऱ्याच्या कार्यवाहीच्या नियमिततेसाठी, कोणत्याही चौकशीचे किंवा कोणत्याही कार्यवाहीचे अभिलेख मागवू शकतात आणि तपासू शकतात.
>
> परंतु, दुय्यम अधिकाऱ्याच्या निर्णयाच्या किंवा आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, कोणत्याही महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्याकडून या पोट-कलमाअन्वये किंवा पोट-कलम (२) अन्वये अशी कोणतीही कार्यवाही सुरु करण्यात येणार नाही .
>
> (२) तहसीलदार, नायब तहसीलदार आणि जिल्हा निरीक्षक, भूमि-अभिलेख यांस, ज्या प्रकरणी रीतसर किंवा संक्षिप्त चौकशी करण्यात आली नाही अशा कोणत्याही प्रकरणामध्ये, त्याच्या हाताखालील कोणत्याही अधिकाऱ्याने केलेली कार्यवाही सुद्धा त्याच रीतीने मागविता येईल व तपासता येईल.
>
> (३) जर कोणत्याही बाबतीत राज्य शासनाला किंवा पोट -कलम (१) किंवा पोट -कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला असे आढळून येईल की , अशा रीतीने मागविलेला कोणताही निर्णय किंवा आदेश किंवा कार्यवाही यात

फेरफार करणे, तो निर्णय किंवा ती कार्यवाही रद्द करणे किंवा फिरवणे आवश्यक आहे, तर राज्य शासनास किंवा अशा अधिकाऱ्यास योग्य वाटेल असा त्यावर आदेश देता येईल .

परंतु, कोणत्याही महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्यापुढे दाखल केलेली कोणतीही कार्यवाही ही, ज्या दिनांकास अशी कार्यवाही दाखल केली असेल त्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीच्या आत निकालात काढण्यात येईल.

परंतु आणखी असे की, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा ) अधिनियम , २०१६ याच्या प्रारंभाच्या दिनांकास, कोणत्याही महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्यापुढे, या कलमाखालील कोणतीही प्रलंबित कार्यवाही ही, अशा प्रारंभाच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीच्या आत निकालात काढण्यात येईल :

परंतु आणखी असे की, या पोट-कलममध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत अशी कोणतीही कार्यवाही निकाली काढण्यात पुनरीक्षण प्राधिकरण अयशस्वी झाल्यास, केवळ राज्य शासन, लेखी कारणे नोंदवल्यानंतर योग्य वाटेल अशी कोणतीही कार्यवाही निकाली काढण्यासाठी पुढील मुदतवाढ देण्यास सक्षम असेल.

परंतु आणखी असे की, राज्य शासनास, किंवा जो पुनरीक्षण प्राधिकाऱ्यास वरिष्ठ असेल अशा, त्याबाबतीत पदनिर्देशित केलेल्या जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यास, अशी कोणतीही कार्यवाही निकालात काढण्यासाठी अपवादात्मक परिस्थितीत, कारणे लेखी नमूद करून, आणखी सहा महिन्यांचा कालावधी वाढवून देता येईल.

परंतु आणखी असे की, जर पुनरीक्षण प्राधिकारी पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत अशी कोणतीही कार्यवाही, पुरेशा कारणाशिवाय, निकालात काढण्यात कसूर करील तर, तो त्यास लागू असलेल्या संबंधित शिस्तभंगविषयक नियमांनुसार शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र ठरेल .

परंतु, राज्य शासन किंवा असा अधिकारी, खाजगी व्यक्तींच्या परस्परांमधील हक्काबाबतच्या कोणत्याही प्रश्नावर परिणाम करणाऱ्या कोणत्याही आदेशात संबंधित पक्षकारांना उपस्थित राहण्याबद्दल आणि अशा आदेशाच्या समर्थनार्थ आपले म्हणणे मांडण्याबद्दल नोटीस दिल्याशिवाय फेरफार करणार नाही किंवा तो फिरविणार नाही.

परंतु आणखी असे की, रीतसर चौकशी करण्यात आली असेल अशा कोणत्याही बाबतीत, सहायक किंवा उप-जिल्हाधिकारी, स्वतः होऊन असा आदेश देणार नाही. परंतु तो आपल्या अभिप्रायासह ती कागदपत्रे जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करील व जिल्हाधिकारी त्यावर त्यास योग्य वाटतील असे आदेश देईल .

(४) पोट-कलम (१) किंवा (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्याने त्यांअन्वये दिलेल्या आदेशावर पुनरीक्षण अनुज्ञय असणार नाही; परंतु, केवळ राज्य शासनाने, पोट - कलम (१) किंवा (२) अन्वये दिलेल्या अशा कोणत्याही आदेशात फेरफार करणे,त्याचे विलोपन करणे किंवा तो फिरवणे हे, कायदेशीर असेल.

कलम २५६ च्या उप-कलम (३) मध्ये पुनरीक्षण प्राधिकरणाला ज्या आदेशाविरुद्ध पुनरीक्षण केले आहे त्या आदेशाच्या अंमलबजावणीला स्थगिती देण्याचा अधिकार आहे. सदरची तरतूद ही कलम २५६ च्या उप-कलम (२) च्या तरतुदीसारखीच आहे ज्याद्वारे अपील प्राधिकरणाला स्थगिती देण्याचा अधिकार आहे.

८. या संहितेच्या तरतुदींनुसार राज्य सरकार अपीलीय प्राधिकरण/पुनरीक्षण प्राधिकरण म्हणून पक्षकारांमधील खटल्याचा निर्णय घेऊ शकते.म्हणूनच, राज्य सरकार अपील/ पुनरीक्षण हाताळताना अर्ध न्यायिक अधिकारांचा वापर करते. सदर संहितेअंतर्गत प्राधिकाऱ्यांनी पारित केलेल्या अर्ध न्यायिक आदेश हाताळण्याचे अपीलीय आणि पुनरीक्षण अधिकार क्षेत्र राज्यांना देण्यात आले आहे. अनेक प्रकरणांमध्ये राज्य सरकारला जमिनीच्या मालकी हक्काच्या मुद्यावरही निर्णय घ्यावा लागतो. अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये कलम २० अंतर्गत कार्यवाहीमध्ये पारित केलेल्या आदेशांमधून उद्भवलेल्या पुनरीक्षणांचा समावेश आहे. सदर संहितेच्या कलम ३२८ अंतर्गत नियम बनवण्याच्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र जमीन महसूल (अपील, पुनरीक्षण आणि पुनरावलोकन) नियम, १९६७ (थोडक्यात "१९६७ चे कथित नियम' ) तयार

करण्यात आलेले आहेत. नियम ३ ते ५ हे केवळ तात्विक नियम आहेत जे खालीलप्रमाणे आहेत :

**"३. प्रपत्र आणि अपीलातील मजकूर आणि अर्ज :**

(१) संहितेच्या प्रकरण XIII अंतर्गत पुनरीक्षण किंवा पुनरावलोकनासाठीचे प्रत्येक अपील किंवा एखादा अर्ज योग्य प्राधिकरणास संबोधित केलेल्या याचिकेच्या स्वरुपात असावा आणि तो संक्षिप्त आणि समजण्याजोग्या भाषेत तयार केलेला असावा. त्यावर अपीलकर्त्याची किंवा लागू असल्यास, अर्जदाराची किंवा त्याच्या अधिकृत एजंटची/दलालाची स्वाक्षरी किंवा अंगठ्याचा ठसा असावा आणि मुंबई न्यायालय शुल्क कायदा १९५९ मधील तरतुदींनुसार आवश्यक त्या मूल्याचे न्यायालयीन शुल्क तिकीट लावलेले असावे.

(२) अपील किंवा अर्जात पुढील तपशील असावेत, ते म्हणजे ;

(i) अपीलकर्ता किंवा अर्जदाराचे नाव, जसे लागू असेल;

(ii) त्याच्या वडिलांचे नाव ;

(iii) त्याचा व्यवसाय, निवासस्थान आणि पत्ता, आणि

(iv) अपीलकर्ता किंवा अर्जदाराचे लेखकाचे नाव आणि पत्ता, उपलब्ध असल्यास

(२) अपील किंवा अर्जामध्ये, अपीलकर्ता किंवा अर्जदाराने त्याच्या अपील किंवा अर्जाच्या समर्थनार्थ ज्या तथ्यांचा आधार घेतला आहे त्या तथ्यांचे संक्षिप्त वर्णन आणि निवेदन आणि ज्या आदेशाविरुद्ध किंवा निर्णयाविरुद्ध अपील किंवा अर्ज केला आहे त्या आदेशावर किंवा निर्णयावर त्याने आक्षेप घेण्याचे कारण यांचा समावेश असावा.

**४. अपील आणि अर्ज सादर करणे:-**

(१) पुनरीक्षण किंवा पुनरावलोकनासाठी अपील किंवा अर्ज एकतर व्यक्तीशः योग्य प्राधिकरणाकडे सादर केले जावे किंवा टपालाद्वारे त्यांच्याकडे पाठवले जावे.

(२) जर अपील किंवा अर्ज टपालाद्वारे पाठवला जात असेल, तर अपील किंवा अर्ज असलेल्या पाकिटासह टपाल खर्च नेहमी पूर्णपणे अगाऊ (प्री-पेड) भरलेला असणे आवश्यक आहे.

**५. अपील आणि अर्ज फेटाळणेः-**

कुठल्याही तात्विक बाबींसंदर्भात ठरवून दिलेल्या नियमांच्या तरतुदींचे पालन न केल्यास अपील किंवा अर्ज त्याच्या गुणवत्तेची चौकशी न करता फेटाळला जाऊ शकतो."

९. आता आपण **श्रीमती सावित्री चंद्रकेश पाल (उपरोक्त)** प्रकरणातील निर्णयाचा संदर्भ घेऊ ज्यात प्रक्रियात्मक मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आली आहेत.या न्यायालयाच्या विद्वान एकल न्यायाधीशांनी परिच्छेद १७ ते १९ मध्ये खालील मार्गदर्शक तत्त्वे सांगितली आहेतः

" अर्ध न्यायिक प्राधिकरणासाठी प्रक्रियात्मक मार्गदर्शक तत्वे :

--------------------------------------------------------------

१७ . भारतीय राज्यघटनेच्या कलम २२६ आणि २२७ अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन हे न्यायालय अपील, पुनरीक्षण, पुनरावलोकन अर्ज आणि अंतरिम अर्ज इत्यादींची सुनावणी आणि निर्णय घेताना मंत्री, सचिव, अधिकारी आणि याचिकाकर्त्यांसह अर्ध न्यायिक प्राधिकरणांनी स्वीकारावी अशी पुढील प्रक्रिया निर्धारित करते. :

(१) कोणत्या अधिनियमानुसार आणि/किंवा कायद्याच्या कोणत्या तरतुदींनुसार कथित अपील/पुनरीक्षण/पुनरावलोकन किंवा अर्ज दाखल केला आहे याचा उल्लेख अपील अर्ज किंवा पुनरीक्षण, पुनरावलोकन आणि कोणताही अर्ज यामध्ये विशेषतः करावा.

(२) अपीलकर्ता/अर्जदार यांनी अपील अर्ज किंवा पुनरीक्षण यासह संक्षिप्त तारखा आणि घटनांचा सारांश सादर करावा.

(३) वरील प्रकरणात आक्षेपित आदेश/निर्णय प्राप्त झाल्यापासून या संदर्भात लागू असलेल्या कायद्यांतर्गत निर्धारित कालावधीत अपील, पुनरीक्षण आणि/किंवा अर्ज दाखल केला जावा. विलंब झाल्यास, केवळ विलंब माफीसाठीच्या अर्जासह ते स्वीकारले जावे.

(४) अपील, पुनरीक्षण किंवा पुनरावलोकन सादर करताना, अर्जदार, जर व्यक्तिशः दाखल करत असल्यास, आवश्यक कागदपत्रांद्वारे आपली ओळख

सिद्ध करावी किंवा अधिकृत एजंट आणि/किंवा वकिलामार्फत प्रक्रिया दाखल करावी.

(५) अर्जासोबत प्रत्येक विरोधी/प्रतिवादीसाठी पुरेशा प्रती आणि प्राधिकरणासाठी दोन अतिरिक्त प्रती देण्यात याव्यात.

(६) विरोधी /प्रतिवादींना समन्स जारी करण्यासाठी, पुरेशा रकमेची कोर्ट फीस /टपाल तिकिटे अर्ज/अपील अर्ज किंवा पुनरीक्षण यावर चिटकवली जावी.

(७) प्राधिकरणामार्फत सेवा देण्याव्यतिरिक्त, अपीलकर्ता/अर्जदार प्रत्येक विरोधी/प्रतिवादी यांना नोंदणीकृत पोस्टद्वारे अतिरिक्त प्रती पाठवू शकतात आणि प्रेषणाच्या पुराव्यासह सेवा प्रतिज्ञापत्र दाखल करू शकतात. टपाल प्राधिकरणाच्या माध्यमाद्वारे सेवा संदर्भात केवळ टपाल आणि पावती हा सेवेचा पुरावा मानला जावा.

(८) स्थगिती, व्यादेश /इतर अंतरिम आदेश किंवा निर्देश किंवा जैसे थे स्थिती यासारख्या तातडीच्या परिस्थितीत, अर्जामध्ये तातडीची विशिष्ट परिस्थिती असा उल्लेख केला जावा, जी प्राधिकरण नोंदवलेल्या थोडक्यात कारणांनुसार विचारात घेऊ शकेल. या आदेशाची माहिती सर्व प्रभावित/संबंधीत व्यक्तींना देखील तातडीने कळवली जाईल.देय पावतीसह नोंदणीकृत टपाल आणि सर्व पावत्या वेळेत पाठवण्याचा पुरावा म्हणून स्वतंत्रपणे ठेवल्या जाव्यात.

(९) जर खऱ्या अर्थाने तातडी असेल तर संबंधित प्राधिकरण एका विशिष्ट कालावधीसाठी एकतर्फी तात्पुरता दिलासा देऊ शकतो की ज्याची कारणे नोंदिवलीजावी आणि त्या कालावधीतच संबंधित विरोधक/प्रतिवादींना बजावणी केली जाईल. जर अशा पक्षाला अंतरिम दिलासा मिळण्यासाठी किंवा अपील, पुनरावलोकन किंवा पुनरावलोकनासाठी लवकर सुनावणी किंवा चालू ठेवण्याची गरज असेल तर अपीलकर्ता/अर्जदाराने बजावणीचे प्रतिज्ञापत्राचे दाखल करणे आवश्यक आहे .

(१०) सक्षम प्राधिकारी सुनावणीची पुढील तारीख सर्व पक्षकारांना वेळ आणि ठिकाणासह कळवेल आणि शक्य तितक्या सुनावणीच्या या तारखेचे आणि वेळेचे पालन करील .

(११) प्रत्येक विभागातील संबंधित अधिकाऱ्याला सुनावणीच्या वेळी उपस्थित राहण्यास आणि संबंधित प्राधिकाऱ्याला या प्रकरणात साहाय्य करण्यास सांगितले पाहिजे.

(१२) नोटीस मिळाल्याची तारीख आणि सुनावणीची वास्तविक तारीख या दरम्यान वाजवी पुरेसा वेळ द्यावा. जर कोणताही पक्ष पुरेशा कारणास्तव सुनावणीच्या वेळी उपस्थित राहू शकत नसेल, तर अशा पक्षकाराला सुनावणीसाठी आणखी एक संधी दिली जावी.

(१३) अर्धन्यायिक प्रकरणांची सुनावणी करणारे प्राधिकरण अशा सुनावणीसाठी तारीख, वेळ आणि ठिकाण निश्चित करेल. अशा प्राधिकरणाने वैयक्तिकरित्या किंवा फोनवर सुनावणी दरम्यान तृतीय पक्षाशी संवाद साधण्यापासून परावृत्त केले पाहिजे आणि निष्पक्ष सुनावणी प्रभावित होईल किंवा पूर्वग्रहदूषित होईल अशी कोणतीही कृती करणार नाही.

(१४) सुनावणी पूर्ण झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर आणि शक्य तितक्या लवकर, सुनावणीच्या समाप्तीपासून चार ते आठ आठवड्यांच्या कालावधीत, त्यासमोर असलेल्या नोंदींच्या तसेच सुनावणीदरम्यान सादर पारित झालेले निवेदनांच्या आधारावर संबंधित प्राधिकरणाने बोलण्याचा आदेश द्यावा.आदेशात आदेशाचे समर्थन करणारी कारणे असावीत.

(१५) सुनावणी पूर्ण झाल्यानंतर प्राधिकाऱ्याला माहिती किंवा कागदपत्रे प्राप्त होणार नाहीत आणि/किंवा अशा कागदपत्रे आणि/किंवा माहितीच्या आधारावर सकारण आदेश देता येणार नाही जोपर्यंत नैसर्गिक न्यायाच्या नियमांचे पालन करणा-या कार्यवाहीची दखल घेतली जात नाही.

(१६) सुनावणीच्या वेळी निमन्यायिक प्राधिकरणाने पारित झालेले केलेले आदेश सर्व पक्षांना नोंदणीकृत डाकाने कळवावेत.

(१७) राजकीय कार्यकर्ते, विधानसभा सदस्य, संसद सदस्य किंवा तिसऱ्या पक्षाने केलेला कोणताही अर्ज किंवा विनंती किंवा विनंती अर्जाद्वारे विचारात घेतली जाणार नाही जोपर्यंत अशी व्यक्ती उत्तरवादी होत नाही किंवा कार्यवाहीमध्ये हस्तक्षेप करत नाही.

(१८) या आदेशाची माहिति संबंधितांना तातडीने कळवली जाईल.

(१९) सुनावणीची नोंद वेगळ्या रोजनाम्यात काळजीपूर्वक ठेवली जाईल.

(२०) प्राधिकरणाला मदत करण्यासाठी संबंधित अधिकारी/विधी सहाय्यकांच्या टिपण्णी मध्ये केवळ वस्तुस्थिती आणि कायदेशीर तरतुदींचा समावेश असेल.

(२१) कायदा अधिकारी/संबंधित अधिकाऱ्यांनी केलेल्या सूचना आदेशाच्या स्वरुपात नसतील.

(२२)

१८. वरील मार्गदर्शक तत्वांव्यतिरिक्त, अर्ध-न्यायिक अधिकारी लोकमान्य नगर प्रियदर्शिनी विरुद्ध महाराष्ट्र राज्य, २००७ (०१) बॉम्ब सी. आर. ९२९ प्रकरणात या न्यायालयाने घालून दिलेल्या निकषांचे पालन करतील, जे खालील प्रमाणे आहेत.

निकष

(अ) स्थगिती अर्जाचा विचार स्थगितीना संबंधित प्राधिकरणाने किमान अर्जदार/अपीलकर्त्याचे प्रकरण थोडक्यात नमूद केले पाहिजे.

(ब) एकपक्षीय आदेश देताना, विरोधकांना कमी कालावधीसाठी नोटीस देण्यात यावी.

(क) जर एकपक्षीय स्थगिती द्यायची असेल तर आदेशाला मंजुरी देणाऱ्या प्राधिकरणाने एकपक्षीय आदेश देण्यामागील कारणे थोडक्यात स्पष्ट करावीत.

(ड ) आदेश देणा-या प्राधिकरणाने –

(i) सकृतदर्शनी दृष्टीकोनातून एखादा खटला अस्तित्वात आला आहे की नाही याची नोंद ठेवली पाहिजे.

(ii) सुविधांचा समतोल कोणाच्या बाजूने आहे याचे निष्कर्ष/निरीक्षणे नोंदविणे.

(iii) अंतरिम दिलासा न दिल्यामुळे अंतरिम मदत मागणाऱ्या व्यक्तीवर कोणताही प्रतिकूल परिणाम होईल का याचा निष्कर्ष नोंदवावा.

(इ) (i) ते (iii) वरील घटकांवर चर्चा करावी आणि अंतरिम मदत देताना किंवा नाकारताना सकारात्मक निष्कर्ष नोंदवावेत.

१९. महाराष्ट्र सहकारी सोसायटी कायदा, मुंबई भाडेपट्टा कायदा आणि कृषी जमीन कायदा यासारख्या विशिष्ट कायद्यांतर्गत सुनावणीसाठी विशिष्ट नियम नसलेल्या अपील, पुनरावलोकन, आढावा अर्ज/आंतरवर्ती अर्जांच्या सुनावणीच्या संदर्भात वरील प्रक्रियात्मक मार्गदर्शक तत्वे सर्व अर्ध-न्यायिक प्राधिकरणांना देखील लागू असतील.

(भर देण्यात आला)

याच मार्गदर्शक तत्त्वांचा उल्लेख या न्यायालयाच्या खंडपीठाने **श्रीमती छाया जगन काळे** (उपर्युक्त) यांच्या प्रकरणात आपल्या निर्णयात परिच्छेद -२३ मध्ये मान्यतेसह केला आहे.

"२३. सुनावणी दरम्यान, आम्ही मूळ नोंदीच्या अभिलेखांचे अवलोकन केले. आमच्यापैकी एकाने (न्या. व्ही. सी. डागा) २००७ च्या दिनांक २४.०३. २००९ रिट याचिका क्रमांक ४१०१ मध्ये न्यायनिर्णय प्राधिकरणासाठी प्रक्रियात्मक मार्गदर्शक तत्त्वे जारी केल्यानंतरही अधिकारी या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करत नाहीत हे कळल्याने आम्ही अस्वस्थ झालो आहोत.आम्ही त्या न्यायनिर्णयाच्या परिच्छेद क्रमांक १७ मध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्वांना मान्यता देतो आणि त्यांचा पुनरुच्चार करतो.त्वरित संदर्भासाठी ते खालील लेखात नमूद केले आहेत.

१०. विद्वान सहाय्यक सरकारी वकील यांनी नोंदवलेल्या कागदपत्रांवरून आणि विशेषतः ७ जुलै २०१६ रोजी माननीय मुख्यमंत्र्यांनी पारित केलेल्या आदेशावरून असे दिसते की या संहितेअंतर्गत राज्य सरकार समोर मांडण्यायोग्य असलेल्या अपिलांची/पुनरिक्षण अर्जावर सुनावणी महसूल विभागाचे माननीय कॅबिनेट मंत्री आणि मा. महसूल राज्यमंत्री यांच्याकडून केली जात आहे. या न्यायालयात दाखल झालेल्या अनेक रिट याचिकांमध्ये हे एक सामान्य कारण आहे की, विविध कारणांमुळे, अधिकारांचा वापर करण्यासाठी अधिकार प्राप्त माननीय मंत्री तात्काळ किंवा अंतरिम सवलत देण्यासाठी तातडीची प्रार्थना हाताळण्यासाठी नियमितपणे उपलब्ध असत नाहीत. त्यामुळे, राज्याचे अपील/पुनरावलोकन अधिकार काही वरिष्ठ सचिवांना विहीत करता येतील का, हे राज्य सरकारला तपासावे लागेल.

११.  अनेक प्रकरणांमध्ये, अपील/पुनरावलोकन अर्ज लहान क्षेत्र असलेल्या शेतजमिनींच्या विवादातून उद्भवतात. अशा प्रकरणांमध्ये अल्पकाळातील शेतकरीच याचिकाकर्ते असतात. उक्त संहितेच्या कलम ८५ अन्वये विभाजनाच्या कार्यवाहीतून अपील/पुनरावलोकन उद्भवली आहेत ज्यात पक्षकार वर्षानुवर्षे खटला चालवत आहेत. अनेक प्रकरणांमध्ये आणि विशेषतः शेतकऱ्यांच्या प्रकरणांमध्ये, कार्यवाही प्रलंबित राहिल्याने त्यांच्या उपजीविकेच्या अधिकारावर परिणाम होऊ शकतो. आपल्या राज्यघटनेत जलद न्याय मिळण्याचा अधिकार आहे. अशी अनेक प्रकरणे आहेत जिथे सुनावणीसाठी अपील/पुनरावलोकन अंतरिम दिलासा देण्यासाठी अर्ज स्वीकारण्यास देखील अवाजवी विलंब होतो. अशा प्रकारचा विलंब अपील/पुनरावलोकन करण्याचा उपाय प्रदान करण्याच्या उद्देशाला पराभूत करू शकतो. त्यामुळे अपीलकर्ता किंवा याचिकाकर्त्याला अपील/पुनरावलोकन अर्ज दाखल केल्यानंतर त्वरित अंतरिम दिलासा देण्यासाठी अपील/पुनरावलोकन प्राधिकरणासमोर आपली बाजू मांडण्याची संधी मिळावी हे सुनिश्चित करणे हे राज्याचे कर्तव्य आहे. कोणत्याही परिस्थितीत, याचिकाकर्त्याला अपील/पुनरावलोकन प्राधिकरणासमोर आपले प्रकरण तात्काळ सुनावणीसाठी विचारात घेण्याचा अधिकार आहे कारण तातडीने अंतरिम दिलासा देण्याची गरज आहे. विद्वान सहाय्यक सरकारी वकील यांनी अभिलेखावर दिलेल्या ऑक्टोबर २०१८ च्या शासन निर्णयाच्या मसुद्यामध्ये अधिका-यांना नामनिर्देशित करण्याची तरतूद आहे जे की अपील/पुनरावलोकन अर्जांमधील तातडीचे अर्ज अपील/पुनरावलोकन प्राधिकारा-याकडे ठेवल्या गेल्या नंतर त्यावर निर्णय कधी घ्यावा हे ठरविण्यासाठी अधिकारी नामनिर्देशित करतील. प्रस्तावित शासन निर्णयाच्या या तरतुदीचा अर्थ असा आहे की अपीलीय किंवा पुनरावलोकन प्राधिकरणासमोर आपला खटला मांडण्याची कोणत्याही याचिकाकर्त्याला कधीही संधी मिळणार नाही जेणेकरून तो तातडीने खटला दाखल करू शकेल. याचिकाकर्त्यांना अपिलीय/पुनरावलोकन

प्राधिकरणाकडे अर्ज करण्याची संधी उपलब्ध करून न देणे म्हणजे अंतरिम दिलासासाठी केलेला अर्ज तात्काळ सुनावणीसाठी घेण्यात यावा, अशी प्रार्थना करूनही ते न्याय नाकारण्यासारखेच आहे ज्याला रिट न्यायालयाद्वारे मान्य केले जाऊ शकत नाही. **नूर मोहम्मद विरुद्ध जेठानंद (२०१३) ५ एसएससी २०२** प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला:

> " २८. लोकशाही व्यवस्थेत न्याय यंत्रणेवरील विश्वास हा मूलभूत आणि महत्वाचा मुद्दा आहे. विलंब झाल्यामुळे व्यवस्थेवरचा नागरिकांचा विश्वास हळूहळू कमी होतो, केवळ श्रद्धा आणि श्रद्धेमुळेच व्यवस्था जिवंत राहते, सातत्याने प्राणवायू मिळतो. भंग पावल्याचा परिणाम विनाशकारी घटना घडण्यात होतो ज्यात न्यायाचा पराभव होऊ शकतो.वादग्रस्त व्यक्तीला नेमस्त न्यायाधीशांकडून तर्कशुद्ध निकालाची अपेक्षा असते, परंतु ती तसा विचार करत नाही आणि योग्यच आहे की, आपल्या वेळेचा बळी करणांच्या वेदीवर देण्याचा हेतू ठेवत नाही. वेळेवर न्याय मिळाल्यामुळे विश्वास कायम राहतो आणि शाश्वत स्थैर्य निर्माण होते.जलदगतीने न्याय मिळवणे हा मानवी हक्क मानला जातो, जो लोकशाहीच्या मूलभूत संकल्पनेत खोलवर रुजलेला आहे आणि हा हक्क केवळ कायद्याची निर्मिती नाही तर नैसर्गिक हक्क देखील आहे.या अधिकाराला व्यवस्थेशी संबंधित सर्वांच्या आवश्यक वचनबद्धतेद्वारे पूर्ण केले जाऊ शकते.या विचाराला कल्पनाशक्तीचा एक पैलू म्हणून पाहिले जाऊ शकत नाही कारण अशा विचारांमुळे अशा अधिकाराच्या उद्देशाची केंद्रात्मकता गमावून बसण्याची शक्यता असते.म्हणूनच, न्याय व्यवस्थेत ज्यांची भूमिका आहे, त्याला दूरस्थपणे प्रासंगिक दृष्टिकोनाची कल्पना करण्याची अनुमती दिली जाऊ शकत नाही.
>
> (भर दिला आहे)

जर अपीलकर्ता किंवा अर्जदाराला अंतरिम दिलासा मिळावा यासाठी अपीलीय/पुनरावलोकन प्राधिकरणाकडे सुनावणी घेण्याची परवानगी दिली गेली नाही तर तो न्याय नाकारण्यासारखे ठरेल.यामुळे जलद गतीने न्याय मिळण्याच्या त्यांच्या अधिकाराचे उल्लंघन होईल.त्यामुळे राज्याने ही संधी पक्षकारांना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.अनेक प्रसंगी अपीलीय/पुनरावलोकन अधिकारांचा वापर करणारे माननीय मंत्री उपलब्ध नसतात. माननीय मंत्र्यांच्या अनुपस्थितीत अंतरिम दिलासा देण्यासाठी वरिष्ठ सचिवांना अधिकृत करण्याचा विचार राज्याला करावा लागेल. राज्य सरकारने हे सुनिश्चित केले पाहिजे की अपील/पुनरावलोकन

अधिकारी प्रत्येक कामकाजाच्या दिवसाच्या एका निश्चित वेळी उपलब्ध असतील जेणेकरुन याचिकाकर्ते त्यांच्या प्रकरणांबाबत दाद मागू शकतील.

१२. वकील मंडळाकडून आणखी एक अडचण व्यक्त करण्यात आली आहे ती म्हणजे,जिथे निकाल राखीव ठेवण्यात आला आहे, की जेथे निकाल राखून ठेवला आहे त्या अपील/पुनरावलोकनांमध्ये निकालाच्या घोषणेच्या तारखा कधीही कळवल्या जात नाही. परिणामी, काही प्रकरणांमध्ये, यशस्वी पक्षाला अयशस्वी पक्षासमोर निर्णय/आदेशाची माहिती मिळते जी अयशस्वी पक्षाला निर्णयाला प्रभावीपणे आव्हान देण्यापासून प्रतिबंधित करते. याव्यतिरिक्त, अपील आणि /किंवा पुनरावलोकन अर्जांमधील निकाल निकाल दिल्यानंतर तो तत्काळ एका समर्पित संकेतस्थळावर अपलोड केले जात आहेत हे दर्शविण्यासाठी कोणतेही अभिलेख ठेवलेले नाही.जर निकाल आणि आदेश तसेच अंतरिम आदेश प्रदर्शित केले तर त्यात खूप पारदर्शकता येईल. याव्यतिरिक्त, याचिकाकर्त्यांना प्रमाणित प्रती मिळवण्यासाठी अर्ज करण्याची आवश्यकता नाही.याचिकाकर्त्यांना त्याच्या प्रती डाउनलोड करता याव्यात यासाठी संकेतस्थळावर आदेश अपलोड करणे हा "व्यवसाय सुलभतेचा" एक आवश्यक भाग आहे. जर निर्णय आणि आदेश अपलोड केले गेले तर ते तातडीने याचिकाकर्त्यांना उपलब्ध होतील. संगणक आणि अंतर्जालाच्या युगात, ही याचिकाकर्त्यांची किमान आणि कायदेशीर अपेक्षा असेल. हा देखील न्याय मिळण्याचा अविभाज्य भाग आहे.

१३. आम्हाला आढळून आल्याप्रमाणे अनेक प्रकरणात,पुनरीक्षण अर्ज किंवा/आणि अपिले जे राज्य शासनाकडे दाखल केली आहेत त्यांना नोंदणी क्रमांक ही दिलेले नाहीत. पुनरीक्षण अर्ज किंवा अपीले दाखल करावयाच्या समर्पित संकेतस्थळावर डेटा एंट्री केलेली नाहीत. न्यायालयात केल्या जाणाऱ्या कार्यवाहींच्या नोंदणीप्रमाणेच राज्य शासनाकडे दाखल होणाऱ्या अपिले/पुनरीक्षण अर्जांची नोंदणी केली जात असल्याचे सुनिश्चित करणे आवश्यक आहे. राज्य

शासनाच्या समर्पित सकेतस्थळावर दाखल कार्यवाहींची डेटा एंट्री केल्यास ते योग्यच होईल कारण अशी माहिती पक्षकारांना उपलब्ध होईल. अशा माहितीसोबत प्रकरणातील न्यायनिर्णय आणि आदेश सार्वजनिक संकेतस्थळावर उपलब्ध केल्यास पक्षकाराला त्याच्या प्रकरणातील प्रगती सहज घरबसल्या कळू शकेल. अशा प्राथमिक गोष्टीही न पुरविणे हे न्याय प्रभावीरीत्या देण्यास नकार देण्यासारखेच होईल.

१४. सावित्री चंद्रकेश पाल (उपर्युक्त) यांच्या प्रकरणात एकल न्यायाधीशांनी आधीच जारी निर्देशांव्यतिरिक्त आम्ही योग्य निर्देश जारी करण्याचा प्रस्ताव ठेवतो, ज्याला श्रीमती छाया जगन काळे (उपर्युक्त) यांच्या प्रकरणात विभागीय खंडपीठाने पुष्टी दिली आहे.

१५. आता वैयक्तिक प्रकरणातील तथ्यांचा विचा करता, रिट याचिका क्रमांक ७५०४/२०१५ मधील दिवाणी अर्ज क्रमांक २०४१/२०१५ मधील दिनांक ६ ऑगस्ट २०१५ कडे याचिकाकर्त्याने लक्ष वेधले आहे ज्यात या याचिकेची विषयवस्तू असलेला पुनरीक्षण अर्ज २०१५ साल संपण्याआधी निकाली काढण्याचे आदेश झाले होते. दिनांक ६ ऑगस्ट २०१५ क्या आदेशाच्या भंगासाठी दाखल झालेल्या अवमान याचिकेत पारित दिनांक ८ सप्टेंबर २०१६ रोजीच्या आदेशात दोन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली होती. आता उपरोक्त दिनांक २४ सप्टेंबर २०१८ च्या संप्रेषणाच्या आधारे, विद्वान सहा. सरकारी वकील दावा करतात की पुनरीक्षण याचिका दिनांक २३ ऑगस्ट २०१७ च्या आदेशाने निकाली काढण्यात आली आहे. रिट याचिकेत निश्चित केलेल्या आणि अवमान याचिकेत मुदतवाढ मिळालेल्या अवधीत पुनरीक्षण अर्ज निकाली काढण्यात आली नव्हती या वस्तुस्थितीशिवाय पक्षकारांना आदेश पुरेश्या अवधीत आदेश कळविण्यात आला होता, याबद्दल गंभीर संशय आहे. तरीही, आता न्यायनिर्णयाची प्रत उपलब्ध झाल्याने दिवाणी अर्जात कोणताही दिलासा देण्याची गरज आता नाही.

१६.	इतर दोन रिट याचिकांतील प्रार्थना या सन २०१६ मध्ये केलेल्या अपिलांचा निपटारा शीघ्र करण्याचे निर्देश देण्याविषयी आहेत. रिट याचिकातील गा-हाणे असे आहे की केवळ ही अपिले विचारार्थ घेण्यात आली नाहीत एवढेच नाही तर अंतरिम आदेशाची प्रार्थनाही ऐकून घेण्यात आली नाही. या दोन याचिकांत अंतरिम अर्जावर निर्णय घेण्याचे तसेच अपिले कालबद्ध अवधीत निर्णीत करण्याचे निर्देश देणे आवश्यक आहे.

१७.	सबब, आम्ही दिवाणी अर्ज तसेच रिट याचिका खालील प्रमाणे आदेश देऊन निकाली काढत आहोत :

i) श्रीमती सावित्री चंद्रकेश पाल [उपरोक्त] प्रकरणात दिलेल्या निर्देशांव्यतिरिक्त राज्य शासनाला प्रत्येक अपील/ पुनरीक्षण अर्ज तसेच पुनरावलोकन अर्ज यांची क्रमवार नोंदणी, दिवाणी आणि जिल्हा न्यायालयात कार्यवाही दाखल केली जाते त्याप्रमाणे अनुक्रमांक देऊन केली जात आहे हे सुनिश्चित करण्याचे निर्देश देतात. नोंदणी वही राखण्याबरोबरच राज्यशासनाच्या समर्पित संकेतस्थळावर जे नागरिकाना उपलब्ध असेल दैनदिन कार्यवाहीची डेटा एंट्री केली जाईल.

ii) कार्यवाही नोंदविली आहे, त्या संकेतस्थळावरच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६अन्वये अर्ध-न्यायिक [अपिले/पुनरीक्षण/पुनरावलोकन अर्ज] कार्यवाहीत झालेल्या अंतरिम आणि अंतिम आदेश अपलोड केल जात आहेत हे सुनिश्चित करील.

iii) कार्यवाहीतील पक्षकाराना न्यायनिर्णयासाठी निश्चित दिनांक कळविण्यात आला आहे, सुनिश्चित करील.

iv) ई-मेल पत्ता आणि सेलफोन क्रमांक देणाऱ्या पक्षांना सामान्य सेवेव्यतिरिक्त ई-मेल/एसएमएस/व्हाट्स ॲपद्वारे सुनावणीसाठी निश्चित केलेल्या तारखांची सुचना माहिती देण्याची तरतूद राज्य सरकार करील.

v) या संहितेच्या अंतर्गत राज्य सरकारसमोर अपील/पुनरावलोकन/पुनरावलोकन अर्ज करणाऱ्या पक्षकाराला अपील/पुनरावलोकन प्राधिकरणाकडे जाण्याचा आणि अंतरिम अर्ज साठी हजर राहून प्राधिकरणासमोर अर्ज सुनावणीसाठी तत्काळ घेण्याची प्रार्थना करण्याचा अधिकार आहे असे आम्ही मानतो. तात्काळ निदर्शनास आणून देण्यासाठी आणि अंतरिम/अधिकाल सवलतीसाठी अर्ज

तत्काळ घेण्यात यावा यासाठी याचिकाकर्त्याला अपील /पुनरावलोकन प्राधिकरणासमोर आपली केस नमूद करण्याची संधी आहे याची खात्री करणे हे राज्याचे कर्तव्य आहे. राज्य सरकार माननीय मंत्र्यांच्या अनुपस्थितीत कार्यवाही ऐकू शकणा-या वरिष्ठ सचिवांना अपील/सुधारणा किंवा त्यामधील अंतरिम अर्जांच्या सुनावणीचे अधिकार प्रदान करण्याचा विचार करू शकते;

(vi) त्यात केलेले अपील/पुनरावलोकन अर्ज आणि अंतरिम अर्ज शक्य तितक्या लवकर आणि १७ डिसेंबर २०१७ च्या शासन निर्णयात प्रदान केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार निकाली काढले जातील ;

(vii) रिट पिटीशन (स्टॅम्प ) क्र. ११२५३/२०१७ आणि ११२५४/२०१७ च्या विषयाधीन अपीलांवर हा निकाल आणि आदेश अपलोड केल्याच्या तारखेपासून सहा आठवड्यांच्या कालावधीत सुनावणी केली जाईल आणि ते निकाली काढण्यात येतील;

(viii) नागरी अर्ज क्रमांक २०४१/२०१८ मध्ये वेगळे निर्देश जारी करण्याची आवश्यकता नाही;

(ix) रिट याचिका आणि दिवाणी अर्ज दोन्ही उपरोक्त निर्देशांसह निकाली काढले जातात.

**(एस. सोनक, न्या.)** **(ए. एस. ओक, न्या.)**

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याची कारणाकरता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

****